महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड इमारत, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
Email Id: contact-secretary@mpsc.gov.in Website: https://mpsc.gov.in, https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc ०२२-६९३८५९००

क्रमांक:सीबीटी-०६२२/प्र.क्र.१४/२०२२/३१ दिनांक : १७ जुलै, २०२६

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :- प्रवेश प्रमाणपत्राबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक २३ जुलै २०२६ रोजी आयोजित खाली नमूद संवर्गाच्या संगणक प्रणालीवर आधारित परीक्षांकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील त्यांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | संवर्ग | परीक्षा ठिकाण | परीक्षा दिनांक | परीक्षा वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११४/२०२३ आणि ११५/२०२३ | सहायक प्राध्यापक (जीवशास्त्र) महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ आणि अधिव्याख्याता (जीवशास्त्र) महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (महाविद्यालयीन शाखा) - सामायिक चाळणी परीक्षा | मुंबई | २३ जुलै, २०२६ | सकाळी ०९:०० ते १०:०० |
| २ | ४८/२०२३ आणि ४९/२०२३ | सहयोगी प्राध्यापक (उपयोजित यंत्रशास्त्र), महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ आणि सहायक प्राध्यापक (उपयोजित यंत्रशास्त्र), महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ - सामायिक चाळणी परीक्षा | मुंबई | २३ जुलै, २०२६ | सकाळी ११:३० ते १२:३० |
| ३ | ४८/२०२३ | सहायक प्राध्यापक (कर्मशाळा अधिक्षक), महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा, गट-अ | मुंबई | २३ जुलै, २०२६ | दुपारी ०२:०० ते ०३:०० |
| ४ | ११४/२०२३ आणि ११५/२०२३ | सहायक प्राध्यापक (गणित), महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ आणि अधिव्याख्याता (गणित), महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (महाविद्यालयीन शाखा) - सामायिक चाळणी परीक्षा | मुंबई आणि पुणे | २३ जुलै, २०२६ | दुपारी ०४:३० ते ०५:३० |

**२.** परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षेच्या प्रत्येक सत्राकरिता आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**३.** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान **दोन तास** अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी **अर्धा तास** अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**४. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**५. परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीने उमेदवारास केवळ परीक्षेस आवश्यक असलेले साहित्य/वस्तुच (पारदर्शक पेन, प्रवेश प्रमाणपत्र, मुळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत) परीक्षा कक्षात बाळगण्यास परवानगी असेल. परीक्षेस आवश्यक साहित्या व्यतिरिक्त इतर साहित्य/वस्तु (कॉईन्स, नोटा, चावी, जॅकेट, पॉकेट, पर्स, बॅग, चैन, अंगठी अथवा अन्य मौल्यवान आभूषने इत्यादी) परीक्षा कक्षात बाळगता येणार नाहीत.**

**६.** आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना', प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना, परीक्षेच्या वेळी शारीरिक / परस्पर अंतराच्या Social Distancing) अनुषंगाने करावयाची कार्यवाही / उपाययोजना संदर्भातील सूचना यांचे उमेदवारांनी पालन

करणे अनिवार्य आहे. सदर सूचनांचे उल्लंघन करणा-या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**७.** प्रवेशप्रमाणपत्र मिळण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवारास आयोगाच्या contact-secretary@mpsc.gov.in support-online@mpsc.gov.in या ईमेलवर आणि / अथवा ७३०३८२१८२२ किंवा ०२२६९१२३९१४ या दूरध्वनी क्रमांकावरुन विहित वेळेत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**८.** संगणक प्रणालीवर आधारित परीक्षांकरीता उमेदवारांना सराव करता यावा यासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये Computer Based Examinations > Mock Test' येथे एक वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर मॉकटेस्ट ही केवळ सरावासाठी असुन प्रत्यक्ष परीक्षेचा कालावधी व गुण संबंधित परीक्षेच्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार असेल.

ठिकाण : नवी मुंबई

सरिता बांदेकर-देशमुख,
सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग